पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर
सोलापूर विद्यापीठ
।। विद्यया संपन्नता ।।
NAAC Accredited-2015
'B' Grade (CGPA-2.62)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
# Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur

केगाव, सोलापूर - ४१३ २५५, महाराष्ट्र (भारत)
दुरध्वनी क्र. ०२१७-२७४४७७१ / ७२/ ७३ (११ लाईन्स), फॅक्स : ०२१७-२३५१३००,
संकेतस्थळ: http://su.digitaluniversity.ac/www.sus.ac.in//su.digitaluniversity.ac.in
ई-मेल: bcudugc@sus.ac.in विस्तारीत क्रमांक - १६२, २०१

**शिक्षक मान्यता विभाग- २** **Teacher Approval Section -२**

## अत्यंत महत्वाचे
## परिपत्रक

सन २०१९-२० व सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षामध्ये विद्यापीठाशी संलग्नीत असलेल्या सर्व अनुदानित महाविद्यालयातील शिक्षकांचे सर्व स्तरातील (स्टेजमधील) स्थाननिश्चिती / पदोन्नतीचे प्रस्तावावर विद्यापीठामध्ये केंद्रीय पद्धतीने स्थाननिश्चिती / पदोन्नती शिबीर (CAS) चे आयोजन करुन स्थाननिश्चिती / पदोन्नती ची कार्यवाही करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचा दि. ०८ जुलै २०१९ च्या शासननिर्णयातील तरतुदीनुसार अध्यापकांच्या पदोन्नतीस विलंब होऊ नये अध्यापकांचे नुकसान होऊ नये ही बाब विचारात घेऊन CAS बाबत वेळापत्रक निश्चित करावे किंवा दर महिन्याला एका ठराविक दिवशी शक्यतो शेवटच्या आठवड्यात CAS साठी बैठक आयोजित करावी. दर महिन्याला CAS ची बैठक घेतल्यामुळे प्रकरणांची संख्याही मर्यादित राहिल व प्रकरणे प्रलंबित राहणार नाहीत.

*तसेच मा. विभागीय सहसंचालक, उ.शि. सोलापूर विभाग, सोलापूर यांचे दि. ०३/०५/२०२१ रोजीच्या पत्रान्वये राज्यात कोव्हीड -१९ च्या पार्श्वभूमीवर राज्य आपत्ती टाळेबंदी घोषित करण्यात येत आहे त्याचप्रमाणे विविध आस्थापनेवरील कार्यालयामध्ये कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीबाबतचे निर्बंध असल्याने तसेच राज्यातील कोव्हीड -१९ची पार्श्वभूमी विचारात घेता विद्यापीठ स्तरावर शिबीराच्या निमित्ताने अध्यापकांची गर्दी होऊ नये व वर उल्लेख केल्याप्रमाणे टाळेबंदी व कर्मचारी उपस्थितीबाबतचे निर्बंध यांच्यामुळे स्थाननिश्चिती/पदोन्नतीच्या कामकाजास विलंब होत आहे. स्थाननिश्चिती / पदोन्नतीचे कामकाज महाविद्यालयाच्या स्तरावर झाल्यास शासनाच्या निर्बंधाचे अनुपालन करुन कामकाज करता येणे शक्य होईल तसेच अध्यापकांच्या पदोन्नतीचे कामास विलंब होणार नाही व अध्यापकांचे नुकसान होणार नाही.*

**सबब प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नीत असलेल्या सर्व महाविद्यालयांना सदरच्या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, यापुढे महाविद्यालयातील सर्व स्तरावरील शिक्षकांची स्थाननिश्चिती / पदोन्नतीची प्रक्रिया महाविद्यालय स्तरावर करण्यात यावी.**

डॉ. यु. व्ही. मेटकरी
उपकुलसचिव

**जा. क्र. पुअहोसोविसो/शि.मा.-२/२०२०-२१/** 5058
**दिनांक :-** 14 JUL 2021

G:\0_Mauli\Paripatrak_TA-II.docx